गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, ००, ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण, (००) (००)(०३) पोलीस क्रीडा निधीसाठी अंशदान (अनिवार्य) (२०५५ ०२८४) या तपशीलवार लेखाशीर्षाखाली, ३२-अंशदाने या उद्दिष्टाकरिता सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात मंजूर अनुदानापैकी आणखी २० टक्के अनुदान वितरित करणे व खर्च करणे यांकरिता मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्र. विनियो-०५१८/ प्र.क्र.२०४/ दोन/ पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ०८ मार्च २०१९.

वाचा :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८.

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. विनियो-०५१८/ प्र.क्र.२०४/ सात/ पोल-७, दिनांक २८.०६.२०१८.

३) शासन शुध्दिपत्र, गृह विभाग, विनियो-०५१८/ प्र.क्र.२०४/ सात/ पोल-७, दिनांक २४.०९.२०१८

४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९.

५) पोलीस महासंचालक, म.रा. यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २८/ ६९०९/ पो.क्री.निधी/२६९/ २०१७, दिनांक २५.०१.२०१९.

६) पोलीस महासंचालक, म.रा. यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २८/ ६९०९/ पो.क्री.निधी/२६९/ २०१७, दिनांक २७.०२.२०१९.

प्रस्तावना.

सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, ००, ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण, (००) (००)(०३) *पोलीस क्रीडा निधीसाठी अंशदान* (अनिवार्य) (२०५५ ०२८४) या तपशीलवार लेखाशीर्षाखाली, ३२-अंशदाने या उद्दिष्टाकरिता रु.१,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) इतके अनुदान मंजूर करण्यात

आले आहे. त्यापैकी ७० टक्के अनुदान अर्थात रु.७०,००,०००/- (रुपये सत्तर लक्ष फक्त) वितरित करणे व खर्च करणे यांकरिता, शासन निर्णय, गृह विभाग, क्र. विनियो-०५१८/ प्र.क्र.२०४/ सात/ पोल-७, दिनांक २८.०६.२०१८ *(शासन शुद्धिपत्र, गृह विभाग, क्र. विनियो-०५१८/ प्र.क्र.२०४/ सात/ पोल-७, दिनांक २४.०९.२०१८, यासह वाचावे)* द्वारे मंजुरी देण्यात आली आहे.

२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी रु.७०,००,०००/- इतक्या रकमेचे उपयोजन प्रमाणपत्र सादर केले असून बाकी अनुदान उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे.

३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९, अनुसार अर्थसंकल्पित अनुदान खर्चाची मर्यादा ही महसुली लेख्यातील अनिवार्य खर्चाच्या बाबींवर ९० टक्के इतकी निश्चित करण्यात आली आहे. त्या अनुसार उक्त तपशीलवार लेखाशीर्षाखाली ३२-अंशदाने या उद्दिष्टाकरिता चालू वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पित अनुदानातील आणखी २० टक्के अनुदान वितरित करणे व खर्च करणे यांकरिता मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय.

सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, ००, ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण, (००) (००)(०३) पोलीस क्रीडा निधीसाठी अंशदान (अनिवार्य) (२०५५ ०२८४) या तपशीलवार लेखाशीर्षाखाली, ३२-अंशदाने या उद्दिष्टाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातील आणखी २० टक्के अनुदान अर्थात रु.२०,००,०००/- (रुपये वीस लक्ष फक्त) वितरित करणे व खर्च करणे यांकरिता, याद्वारे, मंजुरी देण्यात येत आहे.

२. उक्त निधी हा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, येथून काढून संबंधिताना देण्याच्या प्रयोजनासाठी कार्यालय अधीक्षक, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय, मुंबई, यांना आहरण व संवितरण अधिकारी, आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. तसेच, याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८, याच्या परिशिष्टातील अ.क्र.८ मधील तपासणी सूचीतील आणि उक्त शासन परिपत्रकातील परिच्छेद ७ मधील अटींची सर्वसाधारणपणे पूर्ती झाली आहे.

४. हा शासन निर्णय, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९, अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१११०५११४९७२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL
GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad0118
4493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND
FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI,
serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b9
5322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL
BORSE
Date: 2019.03.11 10:53:03 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. गृह राज्यमंत्री (शहरे/ ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.
७) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

प्रत-

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
६) कार्यासन अधिकारी (अर्थसं.-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड फाईल, पोल-७.